**<u>ठळक बातम्या.</u>**

- देशभरात ७ टप्प्यात लोकसभा निवडणूक, ४ जून रोजी निकाल जाहीर होणार

- राज्यात लोकसभेसाठी १९ एप्रिल, २६ एप्रिल, ७ मे, १३ मे आणि २० मे रोजी मतदान

- लोकसभेसोबतच आंध्र प्रदेश, ओडिशा, सिक्कीम आणि अरुणाचल प्रदेश विधानसभा निवडणुकांचीही घोषणा

- निवडणूक प्रचारात व्यक्तिगत आरोप-प्रत्यारोप आणि लहान मुलांचा वापर टाळण्याचं निवडणूक आयोगाचं आवाहन

**आणि**

- दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात नवी दिल्लीत उद्या महिला प्रीमियर क्रिकेट लीगचा अंतिम सामना

**<><><><><>**

देशाच्या लोकसभा निवडणुकांचं बिगुल आज वाजलं. देशात एकूण ७ टप्प्यात मतदान होणार असून ४ जून रोजी मतमोजणी होईल. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत आज ही घोषणा केली. निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंग संधु यावेळी उपस्थित होते. निवडणुकीच्या घोषणेसोबतच आता देशभरात आचारसंहिता लागू झाली आहे.

पहिल्या टप्प्यात १९ एप्रिल रोजी १०२ मतदारसंघात, दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिल रोजी ८९ मतदारसंघात, तिसऱ्या टप्प्यात ७ मे रोजी ९४ मतदारसंघात,

चौथ्या टप्प्यात १३ मे रोजी ९६ मतदारसंघात, पाचव्या टप्प्यात २० मे रोजी ४९ मतदारसंघात, सहाव्या टप्प्यात २५ मे रोजी ५७ मतदारसंघात आणि सातव्या टप्प्यात १ जून रोजीही ५७ लोकसभा मतदारसंघात मतदान होईल. राज्यात एकूण ५ टप्प्यात मतदान होणार आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकांच्यावेळी देशात ७ आणि राज्यात ४ टप्प्यात मतदान झालं होतं. देशात लोकसभेच्या ५४३ मतदारसंघात निवडणूक होणार असून त्यातल्या ८४ जागा अनुसूचित जाती आणि ४७ जागा अनुसूचित जमातींसाठी राखीव आहेत.

**<><><><><>**

उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगालमध्ये यंदा सर्व ७ टप्प्यात मतदान होणार आहे. महाराष्ट्र आणि जम्मू-काश्मिरमध्ये ५ टप्प्यात, ओडिशा, मध्यप्रदेश आणि झारखंडमध्ये ३ टप्प्यात, छत्तीसगड आणि आसाममध्ये २ टप्प्यात मतदान होईल. अरुणाचल प्रदेश, अंदमान निकोबार बेटं, आंध्र प्रदेश, चंदीगड, दादरा नगर हवेली, दिल्ली, गोवा, गुजरात, हिमाचल प्रदेश, हरियाणा, केरळ, लक्षद्वीप, लडाख, मिझोरम, मेघालय, नागालँड, पुद्दुचेरी, सिक्कीम, तामिळनाडू, पंजाब, तेलंगणा आणि उत्तराखंडमध्ये केवळ एका टप्प्यात मतदान होईल.

केंद्रीय निवडणूक आयोगानं आज आंध्र प्रदेश, ओडिशा, सिक्कीम आणि अरुणाचल प्रदेश विधानसभा निवडणुकांचीही घोषणा केली. सिक्कीममध्ये ३२, ओडिशात १४७, आंध्रात १७५ आणि अरुणाचल प्रदेशात विधानसभेच्या ६० जागा आहेत. या सर्व ठिकाणी लोकसभेच्या सोबतच विधानसभा मतदारसंघांची निवडणूक प्रक्रिया राबवली जाणार आहे. या सर्व राज्यांच्या विधानसभांचा कार्यकाळ जूनमध्ये पूर्ण होणार आहे. निवडणूक आयोगानं आज १३ राज्यातल्या २६ विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकाही जाहीर केल्या.

**<><><><><>**

राज्यात लोकसभेच्या निवडणुका पहिल्या ५ टप्प्यात मतदान होणार आहेत. राज्यात लोकसभेच्या ४८ जागांसाठी मतदान होणार असून त्यातल्या ५ अनुसूचित जाती आणि ४ अनुसूचित जमातींसाठी राखीव आहेत. अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधींकडून

होल्ड व्हाइस कास्ट

*पहिल्या टप्प्यात विदर्भातल्या रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर आणि चंद्रपूर या ५ लोकसभा मतदारसंघात १९ एप्रिल रोजी मतदान होईल.*

*दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिल रोजी बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या विदर्भ आणि मराठवाड्यातल्या ८ लोकसभा मतदारसंघात आणि अकोला पश्चिम या विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुकीसाठी मतदान होईल. गोवर्धन शर्मा यांच्या निधनामुळं ही पोटनिवडणूक होणार आहे.*

*तिसऱ्या टप्प्यात ७ मे रोजी राज्यातल्या ११ मतदारसंघात मतदान होईल. त्यात रायगड, बारामती, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि हातकणंगले या राज्याच्या दक्षिण, पश्चिम भागातल्या आणि कोकणातल्या लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे.*

*चौथ्या टप्प्यात १३ मे रोजी राज्यातल्या ११ लोकसभा मतदारसंघात मतदान होईल. त्यात नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, औरंगाबाद, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर, शिर्डी आणि बीड या उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातल्या लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे.*

*पाचव्या टप्प्यात राज्यातल्या १३ लोकसभा मतदारसंघात २० मे रोजी मतदान होईल. यात मुंबईतले सर्व मतदारसंघ, ठाणे, कल्याण, भिवंडी, पालघर, नाशिक, दिंडोरी आणि धुळे या लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे.*

**<><><><><>**

राजकीय पक्षांनी निवडणूक प्रचार करताना व्यक्तिगत आरोप प्रत्यारोप टाळावेत, असं निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. निवडणुकांमध्येही कुणीही हिंसाचार करण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाणार असल्याचं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी स्पष्ट केलं. बळ, पैसा, चुकीची माहिती आणि आचार संहितेचं उल्लंघन हे निवडणूक प्रक्रिया राबवण्याच्या प्रक्रियेत मोठं आव्हान आहे, असं ते म्हणाले.

गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांच्यावरच्या गुन्हांची माहिती पक्षाची वेबसाइट, वृत्तपत्र आणि दूरचित्रवाणी वाहिन्यांवर ३ वेळा प्रसारित करावी लागेल. तसंच समाज माध्यमांवरही द्यावी लागेल, असंही आयोगानं सांगितलं आहे. प्रचारामध्ये कोणत्याही पक्षाला लहान मुलांचा वापर करता येणार नाही असंही आयोगानं स्पष्ट केलं आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि निःपक्षपाती पद्धतीने राबवली जाईल, यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगानं २१०० निरीक्षकांची नेमणूक केली आहे. निवडणुकीतल्या मतदारांच्या सहभागाविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधींकडून

**होल्ड व्हाइस कास्ट**

*देशात ९७ कोटी नोंदणीकृत मतदार असून त्यात ४९ कोटी ७० लाख पुरुष आणि ४७ कोटी १० लाख महिलांचा समावेश आहे. २० ते २९ वयोगटातल्या १९ कोटी ८४ लाख मतदारांनी मतदार यादीत नाव नोंदवलं असून त्यापैकी १ कोटी ८० लाख मतदार पहिल्यांदाच मतदान करणार आहेत. देशात १ हजार पुरुष मतदारांमागे ९४८ महिला मतदार आहेत. मात्र १२ राज्यांमध्ये महिला मतदारांची*

*संख्या पुरुषांपेक्षा अधिक आहे. २०२४ या वर्षात वयाची १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या १३ लाख ४ हजार युवकांची नोंदणीही निवडणूक आयोगानं यावेळी केली आहे.*

*देशात ८२ लाखांहून अधिक मतदार ८५ पेक्षा जास्त वयाचे आहेत. १०० पेक्षा जास्त वय असणारे २ लाख १८ हजार मतदार देशात आहेत. तसंच ८८ लाख ४० हजार दिव्यांग नागरिकांनी मतदार म्हणून नोंदणी केली आहे. देशभरातल्या ८५ पेक्षा जास्त वय असलेल्या मतदारांना किंवा ४० टक्क्यांपेक्षा अधिक अपंगत्व असलेल्या दिव्यांग मतदारांना यंदा घरुन मतदान करण्याची सुविधा मिळणार आहे. त्यासाठी त्यांच्या घरापर्यंत १२ डी अर्ज पोहोचवला जाईल, हा अर्ज भरुन देणाऱ्यांना घरुन मतदान करण्याची सोय उपलब्ध असेल. या मतदारांनी मतदान केंद्रात जाऊन मतदान करण्याचा पर्याय निवडला तर त्यांना स्वयंसेवकांमार्फत चाकाची खुर्ची पुरवली जाईल.*

*यंदाच्या निवडणुकांमध्ये साडे १० लाख मतदान केंद्र असणार असून त्यासाठी ५५ लाख मतदान यंत्र वापरली जातील. एका मतदान केंद्रात जास्तीत जास्त १५०० मतदारांचा समावेश असेल. मतदानाच्या प्रक्रियेत यंदा दीड कोटी अधिकारी-कर्मचारी आणि सुरक्षा कर्मचारी सहभागी होणार आहेत.*

**<><><><><>**

प्रसारभारतीचे अध्यक्ष म्हणून भारतीय सनदी सेवेतले निवृत्त अधिकारी नवनीत कुमार सेहगल यांनी आज पदभार स्वीकारला. सेहगल हे १९८८ च्या तुकडीतले उत्तरप्रदेश केडरचे अधिकारी आहेत.

**<><><><><>**

भ्रष्टाचाराचा नायनाट करण्यासाठी आणि विकासाला चालना देण्यासाठी भाजपचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणुकीत

जनतेचा पाठिंबा मागितला आहे. ते आज कर्नाटकातील कलबुर्गी इथं जाहीर सभेला संबोधित करताना बोलत होते.

**<><><><><>**

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत, दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा अंतिम सामना नवी दिल्लीच्या अरूण जेटली स्टेडियमवर होणार आहे. हा सामना उद्या संध्याकाळी साडेसात वाजता सुरू होईल.

काल आरसीबीनं गतविजेत्या मुंबई इंडियन्सचा पाच धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं निर्धारित २० षटकांत ६ गडी गमावून १३५ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सनं २० षटकांत ६ गडी गमावत केवळ १३० धावा केल्या.

या स्पर्धेतले दिल्ली कॅपिटल्सनं आठपैकी सहा सामने जिंकले आहेत, तर रॉयल चॅलेंजर्सला केवळ चार सामने जिंकता आले आहेत.

**//<><><><><>//**